# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 15 April 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १५ एप्रिल २०२४ दुपारी १.०० वा.

****

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्याच्या प्रचाराला आता वेग आला असून, सर्वच राजकीय पक्षांचे स्टार प्रचारक प्रचारसभा घेत आहेत. पहिल्या टप्प्यासाठी येत्या १९ एप्रिलला, तर दुसऱ्या टप्प्यासाठी २६ एप्रिलला मतदान होणार आहे.

भाजपचे ज्येष्ठ नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज केरळमधल्या त्रिशूर इथं प्रचारसभेला संबोधित केलं. तामिळनाडुमधल्या तिरुवेलनेली इथं देखील ते आज सभा घेणार आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी त्यांच्या वायनाड या लोकसभा मतदारसंघात आज प्रचार रॅली काढली आणि नागरीकांशी संवाद साधला.

भाजप नेते अमित शाह हे जयपुरमध्ये, तर काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांची अलवर इथं सभा होणार आहे.

****

कोल्हापूर जिल्ह्यातल्या हातकणंगले आणि कोल्हापूर या दोन्ही लोकसभा मतदारसंघातले महायुतीचे उमेदवार आज उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. कोल्हापूर लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार संजय मंडलिक यांनी शक्ति प्रदर्शन करत रॅली काढली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री हसन मुश्रीफ, भाजप नेते चंद्रकांत पाटील यावेळी उपस्थित आहेत, थोड्याच वेळात मंडलिक उमेदवारी अर्ज भरणार आहेत.

****

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत तृतीयपंथी मतदारांच्या संख्येत दुप्पटीपेक्षा अधिक वाढ झाली असून, ठाण्यात सर्वाधिक तृतीयपंथी मतदारांची नोंद झाली आहे. २०१४ च्या निवडणुकीदरम्यान पहिल्यांदाच पुरुष मतदार, महिला मतदारांबरोबरच तृतीयपंथी अशी तिसरी वर्गवारी करण्यात आली होती. राज्याच्या एकूण मतदार

संख्येत सध्या पाच हजार ६१७ तृतीयपंथी मतदार आहेत. ठाण्यात एक हजार २७९, मुंबई उपनगरमध्ये ८१२, पुण्यात ७२६ तृतीयपंथी मतदारांची नोंद झाली आहे. तृतीयपंथी कार्यकर्ते गौरी सावंत, प्रणीत हाटे आणि झैनाब पटेल हे निवडणूक सदिच्छादूत म्हणून काम करणार आहेत.

****

लोकसभा निवडणुकीत प्रथमच ८५ वर्षांहून अधिक वयाच्या ज्येष्ठ नागरिकांना आणि दिव्यांग मतदारांना घरून मतदान करण्याची मुभा देण्यात आली आहे. वाशिम जिल्ह्यातल्या यवतमाळ-वाशिम आणि अकोला लोकसभा मतदारसंघांमध्ये ही प्रक्रिया सुरू झाली असून रिसोड, कारंजा विधानसभा मतदार संघातल्या एकूण ८११ वयोवृद्ध आणि दिव्यांगांनी गृह मतदान केलं. वाशिम विधानसभा मतदार संघात ही प्रक्रिया १९ आणि २० एप्रिलला होणार आहे.

****

यंदाच्या अमरनाथ आणि चारधाम यात्रेसाठी नोंदणी प्रक्रियेला आजपासून सुरुवात होत आहे. देशातल्या चार प्रमुख बँकांच्या ५४० शाखांमध्ये आणि अमरनाथ श्राईन बोर्डाच्या संकेतस्थळावर नोंदणी करता येणार आहे. १३ वर्षांपेक्षा कमी आणि ७० वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या व्यक्तींना यात्रेसाठी नोंदणी करता येणार नसल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

नांदेड महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडून अग्निशमन सेवा सप्ताहाला जिल्हाधिकारी अभिजीत राऊत आणि महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत आजपासून प्रारंभ झाला. याअंतर्गत २० एप्रिलपर्यंत अग्निशमन सेवाबाबत जनजागृती केली जाणार आहे. आग प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज जिल्हाधिकारी राऊत यांनी यावेळी व्यक्त केली. १९४४ साली मुंबई इथं एका जहाजाला लागलेल्या भीषण आगीत हुतात्मा झालेल्या ६६ अग्निशमन जवान आणि त्यानंतरही विविध ठिकाणी अग्निशमन सेवा बजावताना हुतात्मा झालेल्या सैनिकांना यावेळी अभिवादन करण्यात आलं.

****

राज्यात काल सलग सहाव्या दिवशी अवकाळी पाऊस झाला. विदर्भात मंगळवार ते गुरुवार या तीन दिवसांत तब्बल साडेसात हजार हेक्टरवर पिकांचं नुकसान झाल्याचा

प्राथमिक अंदाज कृषी विभागानं व्यक्त केला आहे. सर्वाधिक चार हजार हेक्टरवरील पिकांचं नुकसान  जळगाव जिल्ह्यात झाल्याचा अंदाज आहे.

परभणी जिल्ह्यात मध्यरात्री दोन वाजेच्या सुमारास वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. या अवकाळी पावसामुळे ज्वारी, शिजवून टाकलेली हळद, फळबागासह भाजीपाला पिकांचं नुकसान झालं.

येत्या दोन दिवसात मराठवाड्यात विजेच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

****

बुलडाणा जिल्ह्यात दिवसेंदिवस उष्णतेचं प्रमाण वाढत असून, जिल्हाभरात एकूण १२ उष्माघाताचे रुग्ण आढळले आहेत. उष्माघात बाधितांसाठी उपजिल्हा रुग्णालयात विशेष कक्ष स्थापन करण्यात आले आहेत.

****

आगामी पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत आतापर्यंत २० भारतीय नेमबाजांनी आपलं स्थान निश्चित केलं आहे. रिओ दी जेनेरिओ इथं आयसीसीएफ ऑलिम्पिक पात्रता स्पर्धेत भारताच्या पलक गुलियानं महिलांच्या दहा मीटर एयर पिस्तुल प्रकारात २१७ पूर्णांक सहा गुणांसह कांस्य पदक जिंकलं.

****